# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक ११/०५/२०१८

**१) मॉनीटरची चोरी :-**

दिनांक २६/०४/२०१६ चे २१.०० ते ०२/०५/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे दि. २६/०४/२०१८ चे २१.०० वाजता त्याचे ऑफीस मधील दुकानाचा लॉक लावुन वैष्णव देवी दर्शन करायला गेले होते दि. ०२/५/२०१८ चे ०९.०० वाजता परत आले तेव्हा दुकानाचा ताला तोडुन कोणीतरी आज्ञात चोराने ऑन लाईन लॅटरी चालविण्याचे मॉनीटर कि.६,०००/ रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी गणेश शिवचरण पेटकर वय ३१ वर्ष रा. खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भा.द.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) ट्रकची चोरी:-**

दिनांक ०९/०५/२०१६ चे १२.०० ते १०/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राहुल गोवर्धन भोंगाडे वय २८ वर्ष रा. सुभाष वार्ड भंडारा याने त्याचा ट्रक एमएच ३६ एफ ९२५२ हा बालेदयान शिवाजी वार्ड पिंगलाई माता मंदीर समोर ऊभा करून दि.२६/०४/२०१८ पासुन ठेवले असता, ट्रकचे १० टायर स्टेपनीसह कि. २,०००००/रु .चे दि. ०९/०५/ २०१८ चे १२.०० वाजता ते दि. १०/ ५/ २०१८ चे ६.०० वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फियचि तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.द.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक १०/०५/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादी याचे घरी येवुन मला मुलासोबत बोलायचे आहे या वरून फिर्यादीने हटकले असता, मुलाला उचलुन नेण्याची धमकी देवुन आरोपींतानी जोरजोराने आरडा ओरड करून फिर्यादी सोबत अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीला आरोपीतांनी जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भा.द.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) देह विक्रीचा व्यवसाय करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक १०/०५/२०१८ चे १६.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील हीने तीचे भाडयाचे घरी अनैतीक व्यापारा करीता ग्राहकांना मुली व स्त्रीया पुरवुन देह विक्रीचा व्यवसाय करतांना आरोपी क्र. २ याचेसह मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. पोटे स्था.गु.शा. यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४,५(क) अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मृत अवस्थेत महिलेचा प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद:-**

दिनांक ०९/०५/२०१८ चे १७.३० ते दि. १०/५/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील बैल घेवुन जावुन शेतात असलेल्या विहीरीचे पाणी बैलांना पाजण्याकरीता बादली घेवुन विहीरीवर गेले असता, विहीरीचे पाण्यावर मृतक सौ. शारदा तिमा कावळे वय ३७ वर्ष रा. मोहगाव खदान हीचे प्रेत दिसल्याने फिर्यादी नितीनकुमार मदनजी गणवीर वय ३७ वर्ष रा. हरदोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला पुढील तपास पोउपनी. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) नदी पात्रात बुडुन इसमाचा मृत्यु :-**

दिनांक १०/०५/२०१८ चे ८.०० वाजता दरम्यान यातील मृतक केवलराम सखाराम पात्रे वय ५५ वर्ष, वळद टोली हे वळद गावाशेजारी नदीचे पाण्यात आंगोळीला गेले असता, नदीचे पात्रात बुडुन मरण पावले असे फिर्यादी सिताराम श्यामराम खोमरे वय ५४ वर्ष रा.वळद टोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नादेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा--या जाणा--या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :--

दिनांक १०/०५/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही जुना बस्टॉप तुमसर येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

८) आमरोड वर येणा--या जाणा--या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :--

दिनांक १०/०५/२०१८ चे १७.२० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील महीन्द्रा मॅक्स वाहन ही भिलेवाडा टि. पॉईंट ते खडकी जाणारा डांबरी रोड येथे सार्वजनीक ठिकाणी उभा करुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सेलोकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

९) अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यांवर धाडी . :--

दिनांक १०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर सिहोरा, गोबरवाही, व साकोली येथे अवैध हातभट्टी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९० लिटर हातभट्टी दारू किमती १२,३६०/--रु. तसेच जुगारातुन कि. ५७१/रु. असा एकुण किंमती १२,९३१/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--

दिनांक १०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक-- ०३ तीन सिटर वाहनाकरीता-- ०६ ईतर वाहनांवरती -- ९६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.